ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 5 | JAN - 2021

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय स्वातंत्र्यलढयातील अरूणा असफ अली यांचे योगदान

प्रा. डॉ. राजु भा. खरडे
आर.बी.व्यास कला वाणिज्य , महाविद्यालय कोंढाळी.



भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांचे कार्य, त्यांनी बजावलेली भुमिका खरोखर प्रशंसनीय आहे. लोकमान्य टिळकांनंतर कॉंग्रेसची धुरा महात्मा गांधींच्या हाती येताच, त्यांनी स्वातंत्र्य लढा अधिक तीव्र करण्यासाठी सत्याग्रह व चळवळ सुरू केली असता. या सत्याग्रहात व चळवळीत हजारो स्त्रीया सहभागी झाल्या म्हणूनच गांधींजी म्हणाले की, ''भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास जेंव्हा लिहला जाईल, तेंव्हा भारतीय स्त्रियांनी केलेल्या कार्याला, त्यागाला अग्रस्थान प्राप्त होईल.'' भारतीय स्वातंत्र्यलढयातील आपल्या कार्याने व कर्तृत्वाने ब्रिटीश सरकारला हादरवून सोडणारी एक महान जहाल स्त्री व १९४२ च्या आंदोलनाची नायीका अरूणा असफ अली होय. १९४२ च्या 'चलेजाव' चळवळीतील कार्य व योगदानामुळेच त्या सदैव भारतीय जनतेच्या हृदयात राहील. या चळवळीतील त्यांचे कार्य अविस्मरणीय असेच होते. त्यांच्यावर महात्मा गांधीजींचा प्रभाव होता. तरी ब्रिटीश विरोधी जहाल कारवायावर त्या विश्वास ठेवीत, त्यांची वृत्ती, ठाम निश्चयी, धाडसी आणि परंपरा धुडकावून लावणारी होती. देशभक्ती, निधर्मीवाद आणि सामाजिक न्यायाशी त्यांची बांधिलकी होती.

भारतीय विरांगना अरूणा असफ अली यांचा जन्म उपेंद्रनाथ गांगुलीच्या घरी, पंजाबमधिल काल्का शहरात १६ जुलै १९०९ रोजी एका बंगाली ब्रांम्हण कुटुंबात झाला. त्यांचे घराणे खुप श्रीमंत होते. वडील उपेंद्रनाथ युनायटेड प्रोव्हींन्सेस मध्ये तर आई अंबिकाबाई ब्राम्हो समाजाचे त्रिलोकनाथ सन्याल यांची कन्या होती. अरूणा असफ अली यांची बहीन पुर्णिमा बॅनर्जी संविधान सभेच्या सदस्या होत्या. अरूणा ज्या काळात जन्मल्या, त्या काळात स्त्रीयांना फारसे शिकविले जात नव्हते, त्यांना घराबाहेर जाण्यासही प्रतिबंध होत होता. अशा विपरीत परिस्थीतीत त्यांना वडीलांनी लाहोरच्या एका कॉन्व्हेंटमध्ये शिकण्यास टाकले, येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. तर माध्यमिक शिक्षण नैनिताल येथिल प्रॉटेस्टंट विद्यालयात झाले. त्यानंतर त्या कलकत्ता येथिल 'गोखले मेमोरीयल कन्या' शाळेत अध्यापनाचे कार्य करून लागल्या. वयाच्या १९ व्या वर्षी म्हणजे १९२८ मध्ये आपल्यापेक्षा वयाने दुप्पट असलेल्या व दुसऱ्या धर्माचे असल्याने घरच्यांचा विरोध असतांना सुध्दा सर्व विरोध जुगारून अलाहाबाद कॉंग्रेसचे सदस्य, प्रसिध्द वकील, स्वातंत्र्य सैनिक असफ अली यांच्याशी विवाह केला. विवाहानंतर अरूणा असफ अली पतीबरोबर दिल्लीला आल्या व दिल्ली हेच त्यांचे कार्यक्षेत्र बनले. असफ अली स्वातंत्र्यानंतर पंडीत नेहरूचे राजदुत म्हणून अमेरीकेत होते. तसेच ओरिसाचे राज्यपाल म्हणून काही काळ कार्य केले. असफ अली कॉंग्रेसचे कार्यकर्ते असल्याने अरूणाजींचा संबंध कॉंग्रेस सोबत येवून त्यांनी स्वातंत्र्य लढयात सहभाग घेतला.

१९३० मध्ये गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ, मिठाचा सत्याग्रह करून सुरू केली. मी भारताला स्वातंत्र्य मिळवून देवू शकलो नाही, तर साबरमती आश्रमात परत येणार नाही. अशी शपथ गांधीजींनी त्यावेळी घेतली. लग्नाला एक दिड वर्ष झाले नसतांनाही, संसारापेक्षा माझ्या राष्ट्राचे स्वातंत्र्य महत्वाचे आहे, असा दृष्टीकोण ठेवुन अरूणा असफ अलींनी सविनय कायदेभंग चळवळीत उडी घेतली तेंव्हा पासुन त्यांनी खादीची साडी घालण्याची प्रतिज्ञा केली. ती जिवनाच्या अखेरपर्यंत खादीची साडी घालून पुर्ण केली. मीठ बनविने, मिरवणुका काढणे, सभा भरविणे यासाठी त्या सतत प्रयत्नशिल असत. त्यामूळे ब्रिटीश सरकारने त्यांना अटक करून, एका वर्षाची तुरूंगवासाची शिक्षा दिली. १९३२ च्या गांधी–इर्विन करारानुसार सर्व राजकीय कैदयांची मुक्तता करण्यात आली. परंतु अरूणा असफ अलींची सुटका करण्यास ब्रिटीश सरकार तयार नव्हते. शेवटी गांधीजींना हस्तक्षेप करावा लागला. तसेच कारागृहातील महिला कैदयांनी त्यांच्या समर्थनार्थ केलेल्या आंदालनामुळे, शेवटी त्यांची सुटका ब्रिटीश सरकारला करावी लागली.

१९३२ मध्ये पुन्हा अरूणा असफ अली यांना अटक करून दिल्लीच्या तिहार जेलमध्ये डांबण्यात आले तुरूंगातील कैदयांना चांगली वागणुक दयावी व तुरूंगात सुधारणा व्हाव्यात यासाठी त्यांनी तुरूंगातच उपोषन केले. शेवटी तुरूंगाधिकाऱ्यांनी त्यांच्या मागण्या मान्य केल्या, पण या लढयाची शिक्षा म्हणून अरूणा असफ अली यांची रवानगी अंबाला जेलमध्ये करून त्यांना एकाकी कोंडीत ठेवण्यात आले.

१९४२ चे भारत छोडो आंदोलन अरूणाजीच्या जिवनाला एक वेगळे वळण देणारी घटना ठरली. ०८ ऑगस्ट रोजी मुंबईचे अधिवेशन संपताच, मध्यरात्रीच कॉंग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांना ब्रिटीश सरकारने अटक केली. ०९ ऑगस्टला सकाळी अटकेची ही बातमी मुंबईत पसरताच, नेतृत्वाची निर्माण झालेली पोकळी जयप्रकाश नारायण, अरूणा असफ अली व राम मनोहर लोहीया यांनी भरून काढली. व भूमीगत राहुन 'भारत छोडो' आंदोलनाला सहकार्य केले. ०९ ऑगस्ट ला सकाळी मिरवणुका काढुन हरताळ पाळायला सुरूवात केली. पोलीसांनी त्याला लाठीमार व गोळीबारांनी उत्तर दिले. परंतु त्याचा जनतेच्या धैर्यावर काही परिणाम झाला नाही. मुंबईच्या गवालीया मैदानावर सकाळी ०९ वाजता झेंडा वंदनाचा कार्यक्रम होईल, असे ०८ ऑगस्टला अधिवेशनातच जाहीर केले असल्याने, दिवस उजाडताच लोक मोठया संख्येने मैदानाकडे जावू लागले. आकाशातुन विज चमकावी तशा अरूणा असफ अली पोलीसांचे सुरक्षा कवच भेदून गवालीया टॅंक मैदानावर आल्या व त्यांनी झेंडा फडकविला आणि 'शुरू हुवा है जंग हमारा' अशी गर्जना केली. देश स्वातंत्र्य झाल्याशिवाय हा लढा थांबणार नाही, असे त्यांनी लोकांना सांगितले ऑगस्ट क्रांती दिनाची ती विरांगना ठरली. यावेळी पोलीसांनी लाठीमार व गोळीबार केला अशाही स्थितीत चपळाईने अरूणा असफ अली, अटक होवू न देता भुमिगत झाल्या. ४ वर्षापर्यंत भूमीगत राहुन त्यांनी आंदोलन चालविले. झेंडा वंदनाच्या कार्यक्रमांनंतर मुंबई पेटली व ही आग संपूर्ण महाराष्ट्रभर पसरली. एका भारतीय स्त्रीने महाराष्ट्राच्या राजधानीत स्वांतंत्र्यलढयाच्या अखेरच्या आंदोलनाचे रणशिंग फुंकून नेतृत्व पत्करण्याचे धाडस दाखविले. जयप्रकाश नारायण व राममनोहर लोहीया या आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेवून ती अखेरच्या स्वातंत्र्यलढयाच्या मैदानात उतरली होती. या भुमिगत काळात काही दिवस अरूणाजी कलकत्याला राहील्या. तेथुनच त्यांनी आंतरप्रांतीय स्वरूपाच्या हालचालींना मार्गदर्शन केले. दिल्लीत असतांना त्यांना रायबहादुर बैशाखसिंग या सरकारी कंत्राटदाराने मदत केली.

अरूणा असफ अली भुमीगत होताच दिल्ली सरकारने त्यांचे घर जप्त करून, २० हजार रूपयात त्याचा लिलाव केला तर मोटरकार ३ हजार रूपयात विकली. परंतू अरूणा असफ अली विचलित झाल्या नाही. शेवटी सरकारने त्यांना पकडून देणाऱ्यांला व माहीती सांगणाऱ्याला ५ हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले. परंतु त्यांचा काही उपयोग झाला नाही. अरूणा असफ अली यांना ब्रिटीश सरकार शेवटपर्यंत पकडू शकले नाही त्या फार आजारी असतांना गांधीजींनी त्यांना अटक करून घेण्यासाठी पत्र लिहीले, परंतु त्यांनी शरणागती पत्करली नाही. शेवटी १९४६ मध्ये त्यांच्यावरील अटक वारंट ब्रिटीश सरकारने रद्द करतांच, त्या १९४६ मध्ये बाहेर आल्या. कलकत्याच्या भाषणात अरूणाजींनी सांगितलेकी, मी भूमिगत ऐवढयासाठीच राहीले होते की, मला ठिकठिकाणी जावून, या अखेरच्या स्वातंत्र्यलढयाला मदत करायची होती. ट्रिब्यून मध्ये असफ अली लिहतात ''१८५७ ची नायीका झाशीची राणी होती, तर १९४२ च्या क्रांतीची नायीका अरूणा असफ अली होती.''

अरूणा असफ अलींनी राम मनोहर लोहीया सोबत 'इन्क्लाब' नावाच्या मासिकाचे संपादकत्व सांभाळले. त्यातुन त्यांनी तरूणांना चेतविणारे लिखान केले. प्यारेलालजींनी लिहले, ''एकदा एका ब्रिटीश सरकारी नोकराची व अरूणा असफ अली यांची भेट झाली असता, त्यांनी अरूणाजींच्या साहसा बद्दल, अचाट धैर्याबद्दल, त्यांने अरूणाजींची तारीफ केली व म्हटले, तुमच्या जागी मी असतो, तर हेच केले असते. यावरून त्या ब्रिटीश व्यक्तींला अरूणाजींचा किती अभिमान वाटत होता हे लक्षात येते.'' १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनात भारतीय जनतेने, सर्व स्तरातील, जाती धर्मातील स्त्रीपुरूषांनी खांदयाला खांदा लावून या चळवळीत भाग घेतल्याने ब्रिटीश सरकार समोर मोठी बिकट परिस्थिती निर्माण झाली. हे सगळ भूमीगत नेत्यांच्या कार्यामुळे व चिथावणीमुळे होते, हे मान्य करावे लागेल.

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अरूणाजींनी कोणतेही अधिकाराचे पद स्विकारने टाळले. परंतु अनेकांनी मन वळविल्याने त्या राजकारणात सक्रीय झाल्या. प्रथम कॉंग्रेसमध्ये, १९४८ मध्ये समाजवादी पक्षात, तर १९५५ मध्ये कम्युनिस्ट पक्षात आणि पुन्हा १९५८ मध्ये कॉंग्रेसमध्ये आल्या. १९५८ मध्येच त्या दिल्ली कॉंग्रेस समितीच्या अध्यक्षा बनल्या व लवकरच त्या दिल्लीच्या महापौर बनल्या अशाप्रकारे त्यांनी स्वातंत्र्यलढयात व स्वातंत्र्यानंतर राजकारणात प्रवेश करून, भारत मातेची सेवा केली. १९५५ मध्ये सोव्हिएट लॅंड नेहरू पुरस्कार, १९७५ मध्ये लेनिन शांतता पुरस्कार तर १९९१ मध्ये त्यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा ''जवाहरलाल नेहरू पुरस्कार'', १९९२ मध्ये पद्मविभुषण पुरस्कार आणि १९९७ मध्ये भारत सरकारने त्यांना सर्वोच्च भारतरत्न हा पुरस्कार अरूणाजींना मरणोत्तर बहाल केला.

**संदर्भग्रंथ:**


१) धर्माधिकारी तारा – स्वातंत्र्यलढयातील स्त्री, ऑगस्ट क्रांती महोत्सव समिती, १९९२

२) गवानकर मोहीनी – भारतीय स्वातंत्र्यात स्त्रीयांचे योगदान, गांधी स्मारक निधी मुंबई

३) मोदी नवाझ–ए – भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रीया, अनुवाद वासंती फडके मेहता पब्लीकेशन हाऊस पुणे २००३

४) पाटील डॉ. पद्मजा – भारतीय इतिहासातील स्त्रीया, फडके प्रकाशन कोल्हापुर, २०००

५) कवी प्रा. माधवी – १०१ श्रेष्ठ महीला (संक्षिप्त चरित्र्य आणि विचारधन) विद्याभारती प्रकाशन लातुर

६) Asthana Pratima - Woman movement in India. Vikas Publication Delhi, 1974